N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S.(ठाणे):** सदर बाजार **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0277 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/05/2022 19:43 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरम्यानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 09/05/2022

**Date To ( दिनांक पर्यंत):** 10/05/2022

**Time From (वेळेपासून):** 11:55 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 11:37 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 10/05/2022 **Time (वेळ):** 18:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 029 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/05/2022 19:43 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सदर बझार पोलीस स्टेशन मधील,ठाणे अंमलदार कक्षामध्ये ,सोलापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** समीर मोहम्मद बच्चुभाई

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1998 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 404,राहुल गांधी झोपडपट्टी, ,मन्सुर लन्ड्रींच्या जवळ, ,सोलापूर ,सदर बाज़ार,सोलापुर शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 404,राहुल गांधी झोपडपट्टी, ,मन्सुर लन्ड्रींच्या जवळ, ,सोलापूर ,सदर बाज़ार,सोलापुर शहर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाना बेशा शिंदे | | | 1. अरविंद धाम पोलीस लाईन बिल्डीग,नंबर 02 रुम नंबर 18 ,सोलापुर,सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दिनांक 10.05.2022मी समीर मोहम्मद बच्चुभाई, वय 24 वर्षे, व्यवसाय गवंडी काम, रा. राहुल गांधी झोपडपट्टी, घर नं. 404, मन्सुर लन्ड्रींच्या जवळ, सोलापूर मो.क्रं. 8767739715मी वरील ठिकाणी मी माझे वडील मोहम्मद बच्चुभाई, पत्नी सना यांचेसह एकत्र राहणेस असुन गवंडी काम करुन कुटुंबाचा उदनिर्वाह करतो. सुमारे दोन महीन्यांपुर्वी माझे व वडीलांचे घरगुती कारणांवरुन भांडण झाले होते. सदरवेळी माझ्या वडीलांच्या ओळखीची महीला नामे उज्वला हलसुरे हीने सदर भांडणात सहभाग घेवुन वडीलांच्या बाजुने माझ्याशी भांडु लागली त्यावेळी तिचेत व माझेमध्ये शाब्दीक बाचाबाची झाली. त्याचा राग मनात ठेवुन तीने माझ्याविरुध्द पोलीस आयुक्त कार्यालय येथे तक्रारी अर्ज केला असल्याबाबत मला माहीत होते. त्यानंतर दि. 02/05/2022 रोजी मला 7020485059 या मोबाईल क्रंमाकावरुन माझ्या मोबाईल क्रंमाकावरुन फोन आला व त्यांनी मी सदर बझार पोलीस स्टेशन येथुन पोलीस वाडेकर बोलतोय असे सांगुन माझ्याविरुध्द सदर बझार पोलीस स्टेशन येथे तक्रारी अर्ज दाखल असल्याबाबत सांगीतले व मला सदर बझार पोलीस स्टेशन येथे येण्यास सांगीतले. त्यानुसार मी सदर बझार पोलीस स्टेशन येथे जावुन पोलीस वाडेकर यांची भेट घेतली असता त्यांनी मला माझ्याविरुध्द उज्वला हलसुरे यांनी तक्रारी अर्ज केला असुन त्यामध्ये माझेवर चप्टर केस झाली असल्याबाबत सांगुन एक जामीनदार बोलविण्यास सांगीतले त्यानुसार मी माझ्या वडीलाचे मित्र संजय यांना बोलावुन घेतले त्यानंतर पोलीस वाडेकर यांनी मला व जामिनदार संजय यांना सहा. पोलीस आयुक्त, विभाग 02, कार्यालय येथे घेवुन जावुन तेथे सहा. पोलीस आयुक्त सर यांच्यासमोर उभे केले. तेथे सहा. पोलीस आयुक्त सर यांनी माझे नाव, पत्ता विचारुन मला दि. 02/05/2022 ते दि. 10/05/2022 रोजी पर्यंत रोज सदरबझार पोलीस स्टेशन येथे जावुन ठाणे अंमलदारकडे हजेरी देण्याकरीता सांगीतले. त्यानुसार सदर बझार पोलीस स्टेशन येथे जावुन तेथे ठाणे अंमलदार कक्षात हजर असलेले एका पोलीसाला मी भेटलो व मेरे उपर चप्टर केस हुवी है, और उसमें मुझे दस तारीख तक हर रोज पोलीस स्टेशन मे हजेरी देणे के लिये बताया है असे सांगीतले. त्यावेळी तो पोलीस कर्मचारी हा गणवेशामध्ये असल्याने मी त्यांच्या ड्रेसवर असलेल्या नेम प्लेटवर त्यांचे नाव एन. बी. शिंदे असे लिहलेले असल्याचे मी वाचले. सदरवेळी शिंदे यांनी मला उद्या दि. 03/05/2022 रोजी पासुन पोलीस स्टेशन मध्ये येवुन हजेरी देण्यास सांगीतले व मी दि. 10/05/2022 पर्यंत हजेरी दिल्यास मला त्याबाबतचे प्रमाणपत्र मिळेल असे सांगीतले. त्यावर मी त्यांनी ते प्रमाणपत्र कधी मिळणार असे विचारले असता शिंदे यांनी मला ते पत्र असेच मिळते का? त्यासाठी 1,000/- रुपये खर्च येतो असे सांगुन मला माझी हजेरी संपण्याच्या 01 दिवस आधी दि. 09/05/2022 रोजी भेटण्याकरीता सदरबझार पोलीस स्टेशन येथे येण्यास सांगीतले. चप्टर केस मध्ये पोलीस स्टेशन येथे दिलेल्या हजेरीचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता कोणालाही कोणतीही रक्कम द्यायची गरज नसते याबाबत मी खात्री केली असुन पोलीस कर्मचारी शिंदे यांनी सांगीतली रक्कम ही लाचेची असल्याबाबत माझी खात्री झाली. पोलीस शिंदे यांनी माझ्या हजेरीचे प्रमाणपत्राबाबत बोलण्याकरीता मला

सदर बझार पोलीस स्टेशन येथे दि. 09/05/2022 रोजी बोलविले असल्याने मी पोलीस कर्मचारी शिंदे यंाचेविरुध्द तक्रार देण्याकरीता दि. 09/05/2022 रोजी ऍंन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात येवुन पोलीस कर्मचारी शिंदे यांचेवर योग्य ती कारवाई करावी अशी विनंती करुन श्री. चंद्रकांत कोळी, पोलीस निरीक्षक यांच्या समक्ष लेखी तक्रार नोंदवली.मी दिलेल्या तक्रारीवर पुढील कार्यवाही करण्यासाठी पोनि. कोळी यांनी तहसिल कार्यालय दक्षिण सोलापूर येथुन श्री. संजय भिमराव रुणवाल, महसुल सहाय्यक व श्री.तुकाराम बिरा सरवदे, शिपाई दोन्ही नेमणुक तहसिल कार्यालय दक्षिण सोलापूर यांना पंच म्हणून उपलब्ध करून घेवून त्यांची पंच म्हणून काम करण्यासाठी संमती घेतली त्यानंतर पोनि कोळी यांनी दिलेल्या सुचनेनुसार मी पुन्हा पंचांसमक्ष माझी तक्रार सविस्तर कथन केली. सापळा अधिकारी पोनि कोळी यांनी मी त्यांच्याकडे दिलेली लेखी तक्रार दोन्ही पंचांना दाखवली. त्यावर दोन्ही पंचांनी व पोनि कोळी यांनी वाचून सह्या केल्या. त्यानंतर पोनि कोळी यांनी मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरवले व सुचना दिल्या की, मी व माझ्या सोबत पंच नं 1 श्री. संजय रुणवाल असे माझ्या दुचाकी वाहनावरुन सदर बझार पोलीस स्टेशन येथे जावुन पोलीस शिंदे यांची भेट घ्यावी व माझ्यावर असलेल्या चप्टर केसबाबत व त्याच्या हजेरीच्या प्रमाणपत्राबाबत चर्चा करावी सदरवेळी शिंदे यांनी हजेरी प्रमाणपत्र देण्याकरीता लाचेची मागणी केल्यास त्यामध्ये तडजोड करावी व सध्या पैसे आणले नसुन नंतर आणून देत असल्याबाबत सांगावे. तसेच पंच नं.1 रुणवाल यंाना माझ्या सोबत हजर राहुन शिंदे व माझ्यामध्ये होणारे संभाषण ऐकावे व ऍंन्टी करप्शन ब्युरो कार्यालय येथे परत यावे अशा सुचना दिल्या. त्यानंतर मला व दोन्ही पंचांना व्हईस रेकर्डर दाखवून त्याविषयी माहिती दिली व त्यामध्ये नवीन मेमरी कार्ड टाकण्यात आले. त्यानंतर मला व पंच 1 रुणवाल यांना सदर बझार पोलीस स्टेशन, सोलापूर शहर येथे पाठविण्यासाठी माझ्या गळ्यात व्हईस रेकर्डर शर्टाचे आतील बाजूस असलेल्या बनियानचे आत अडकावून पंच रुणवाल यांचेसह माझ्याकडील दुचाकी वरुन 11:55 वा. चे सुमारास पाठवले. त्याप्रमाणे मी, पंच नं 1 रुणवाल असे पोलीस शिंदे यांची भेट घेण्याकरीता सदर बझार पोलीस स्टेशन येथे गेलो असता पोलीस शिंदे हे ठाणे अंमलदार कक्षात बसलेले होते. तेथे जावुन मी पोलीस शिंदे यांना माझ्यावर दाखल असलेल्या चप्टर केस तसेच हजेरी बाबत सांगीतले. त्यावर शिंदे यांनी मी दिलेल्या हजेरीचे हया तारखेपासुन ते हया तारखेपर्यंतचे पत्र द्यावे लागते असे सांगुन त्या पत्राचे पाचशे रुपये चार्ज बसतात असे सांगीतले. सदरवेळी मी त्यांना कुछ कम जादा करो असे सांगीतले असता शिंदे यांनी नकार देवुन उद्या दि. 10/05/2022 रोजी माझी हजेरी संपत असल्याने उदयाच पत्र दयाव लागतय असे सांगुन मला उद्या दि. 10/05/2022 रोजी येण्यास सांगितले. त्यावरुन मी व पंच नं.1 रुणवाल असे ऍंन्टी करप्शन कार्यालय सोलापूर येथे परत आलो. तेथे पोनि कोळी यांनी माझ्या गळ्यातील व्हईस रेकडर काढून बंद करुन पंच नं.1 रुणवाल व मला हकीकत विचारुन घेतली. त्यामध्ये आम्ही उपरोक्तप्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर, पोनि श्री. कोळी यांनी व दोन्ही पंचांनी व्हईस रेकर्डरमध्ये माझ्यात व पोलीस कर्मचारी शिंदे यांच्यात झालेले संभाषण ऐकले. त्यामध्ये शिंदे यांनी माझ्याकडे मी सदर बझार पोलीस स्टेशन येथे दिलेल्या हजेरीचे प्रमाणपत्र देण्याकरीता 500/- रुपये लाचेची मागणी करुन दि. 10/05/2022 रोजी सदर बझार पोलीस स्टेशन, सोलापूर शहर येथे घेवुन येण्यास सांगितले असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर शिंदे व माझ्यात झालेल्या पडताळणीचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला असुन तो दोन्ही पंचानी तसेच श्री. कोळी, पोलीस निरीक्षक यांनी वाचुन सहया केल्या. सदर ध्वनिमुद्रीत संभाषणाचा स्वतंत्र उतारा तयार करुन त्यावर देखील दोन्ही पंचानी व श्री. कोळी यांनी सहया केल्या. सदर पडताळणीसाठी वापरण्यात आलेले मेमरी कार्ड खाकी लखोटयामध्ये घालुन त्याचे तोंड डिंकाने चिकटवुन त्यावर लाखेचे सिल करुन सदर लखोटयावर दोन्ही पंचांनी व पोनि कोळी यांनी सहया करुन जप्त केले. झालेल्या पडताळणी कारवाई मध्ये पोलीस शिंदे यानी मला उद्या दि. 10/05/2022 रोजी 500/- रुपये घेवुन सदर बझार पोलीस स्टेशन येथे बोलाविले असल्याने पो नि कोळी यांनी सदरची कारवाई तात्पुरती स्थगीत करुन मला व पंचाना दि. 10/05/2022 रोजी ऍंन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय सोलापूर येथे सकाळी 10:00 वा. येण्याबाबत तसेच सदरबाबत गोपनियता पाळण्याबाबत योग्य त्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे आज दिनंाक 10/05/2022 रोजी मी सकाळी 10.00 वाजता ऍंन्टी करप्शन ब्युरो कार्यालय सोलापूर येथे हजर झालो. त्यावेळी पंच देखील कार्यालयात हजर होते. पोलीस कर्मचारी शिंदे यांच्यावर सापळा कारवाई करण्याचे अनुषंगाने पोनि कोळी यांच्या सुचनेवरून मी शिंदे यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्याकडे असलेले 500/- रूपये हजर केले. त्यात 100/- रूपये दराच्या 05 नोटा होत्या. पोनि कोळी यांनी त्यांच्या अंमलदाराकरवी सदर नोटांचे क्रमांक कोऱ्या कागदावर लिहुन घेतले. पोनि कोळी व दोन्ही पंचानी सदरच्या नोटांचे नंबर पडताळणी करुन त्या कागदावर सह्या केल्या. त्यानंतर सदर नोटांना ऍंथ्रासीन पावडर लावण्याची, त्याचे प्रात्यक्षीक करण्याची कार्यवाही करुन सापळा कारवाई संबंधाने करावयाच्या कामाच्या सुचना ऍंन्टी करप्शन ब्युरो सोलापूर कार्यालयात देण्यात आल्या. त्यानंतर पोनि कोळी यांनी त्यांचे कार्यालयातील पोनि महाडिक, पोना पकाले, पोना घुगे, पोशि पवार व पोशि सन्नके यांना त्यांच्या कक्षामध्ये बोलावुन त्यांची व माझी ओळख करुन झालेल्या पडताळणी कारवाईबाबत थोडक्यात सांगीतले.त्यानंतर यातील पोलीस शिंदे यांच्यावर सदर बाजार पोलीस स्टेशन येथे लाचेचा सापळा आयोजीत केला. त्याअनुषंगाने पोनि कोळी यांनी पुन्हा त्यांच्याकडील व्हईस रेकर्डर दाखवुन त्याविषयी माहिती दिली व त्यामध्ये नवीन मेमरी कार्ड टाकण्यात आले. व सदरचा व्हाईस रेकर्डर चालु करुन माझ्या गळयात शर्टच्या आतील बनियानचे आत अडकवुन मला व पंच नं 1 रुणवाल यांना माझ्या दुचाकी वाहनावरुन सदर बझार पोलीस स्टेशन करीता रवाना केले तसेच पोनि कोळी, पोनि महाडिक व उर्वरीत सापळा पथक असे सरकारी वाहनातुन ऍंन्टी करप्शन ब्युरो कार्यालय सोलापूर येथुन निघुन सदर बाजार पोलीस स्टेशन व परीसरात सापळा लावुन थांबले. त्यानंतर मी व पंच रुणवाला असे सदर बझार पोलीस स्टेशन मध्ये जावुन ठाणे अंमलदार कक्ष येथे गेलो असता तेथे पोलीस कर्मचारी शिंदे हजर होते. सदर ठिकाणी शिंदे यांनी मला बघुन त्यांच्या हाताने पैसे मागणीचा इशारा करुन मी काल सांगीतलेल केल का? आज तारीख आहे ना लास्ट असे बोलुन माझ्याकडे लाचेच्या रक्कमेची मागणी केली. त्यावर मी शिंदे यांनी सांगीतलेल्या रक्कमे मध्ये तडजोड करण्याचा प्रयत्न केला परंतु शिंदे यांनी मान हालवुन नकार दिला व मला लाच रक्कम माझ्या हजेरीच्या नांेद वही मध्ये ठेवण्यास सांगुन मला बाहेर जाण्यास सांगीतले. शिंदे यांनी सांगीतल्याप्रमाणे मी माझ्या शर्टच्या डाव्या खिशात ऍंन्थसिन पावडर लावुन ठेवलेली लाच रक्कम काढुन माझ्या हजेरी नोंद वही मध्ये घालुन ती वही तेथील टेबलवर ठेवुन ठाणे अंमलदार कक्षामधुन बाहेर येवुन नियोजित इशारा केला असता तेथे पोनि कोळी, पोनि महाडिक व सापळा पथक असे सदर ठिकाणी येवून पोलीस शिंदे यांना रंगेहात पकडले.त्यानंतर पोनि कोळी यांनी पंच 01 रुणावल यांना लाचेची रक्कम 500/- रुपये कोणी घेतली असे विचारले असता पंच रुणावल यांनी सदरची लाचेची रक्कम पोलीस शिंदे यांनी तेथे टेबलवर असलेल्या वहीमध्ये ठेवण्यास सांगुन स्विकारले असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि कोळी यांचे सुचनेवरुन सदरची रक्कम पंच नं. 02 सरवदे यांनी ताब्यात घेवुन नोटांची यापुर्वी घेतलेल्या नंबरांशी पडताळणी करता ते तंतोतंत मिळून आले. त्यानंतर सदर ठाणे अंमलदार कक्षामध्ये टेबलच्या जवळ कृत्रिम अंधार करुन सदर नोटा तसेच सदर नोटां ठेवण्यात आलेली वहीच्या आतील पानाची ऍं.वा. दिव्याचे निळ्या प्रकाशात तपासणी करता त्या नोटांवर व वहीच्या आतील पानावर अ.पा.ची निळसर चकाकी दिसून आली. सदरच्या नोटा व नमुद वही ही पुराव्याकामी पोनि कोळी यांनी ताब्यात घेतली. तसेच दोन्ही पंच व सापळा पथकासमक्ष शिंदे यांना त्यांचे नाव गाव याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यंाचे नाव नाना बेशा शिंदे, वय 36 वर्षे, पोलीस नाईक बक्कल नंबर 1701, सदर बाजार पोलीस स्टेशन, सोलापुर शहर राहणार - अरविंद धाम पोलीस लाईन बिल्डीग नंबर 02 रुम नंबर 18 सोलापुर असे सांगितले. त्यानंतर पोनि कोळी यांनी शिंदे यांना पुढील कार्यवाहीसाठी ताब्यात घेत असल्याचे मला व दोन्ही पंचांना सांगितले. त्यानंतर मी पंच 01 रुणावल असे माझ्या दुचाकी वरुन व पोनि कोळी, पंच सरवदे व

सापळा पथक असे शासकीय वाहनाने ऍन्टी करप्शन ब्युरो, सोलापूरच्या कार्यालयात आलो व सदरबाबत सविस्तर सापळा पुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही ऍन्टी करप्शन ब्युरो, सोलापूरच्या कार्यालयात दि.10.05.2022 रोजी पूर्ण करण्यात आली. तरी माझ्यावर दाखल असलेल्या चॅप्टर केसच्या अनुषंगाने सदर बझार पोलीस स्टेशन येथे नेमण्यात आलेल्या हजेरीचे प्रमाणपत्र देण्याकरीता पोलीस नाईक बक्कल नंबर 1701, नाना बेशा शिंदे, सदर बाजार पोलीस स्टेशन, यांनी माझ्याकडे 500/- रुपये लाचेची दि 09/05/2022 रोजी 11:55 ते 12:14 वा. चे सुमारास मागणी करुन दि 10/05/2022 रोजी 11:21 ते 11:37 वा. चे सुमारास सदर बझार पोलीस स्टेशन मधील ठाणे अंमलदार कक्षामध्ये लाच रक्कम 500/- रुपये स्विकारुन गुन्हेगारी स्वरुपाचे वर्तन केले आहे म्हणुन माझी पोलीस नाईक, नाना बेशा शिंदे नेम - सदर बझार पोलीस स्टेशन, सोलापूर शहर यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर मराठी भाषेत टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रींट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

हा जबाब दिला स.ता.म

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Ashwini Shamrao Bhosale(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)** समीर

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अंमलदार
सदर बझार पोलीस स्टेशन
सोलापूर शहर

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** Ashwini Shamrao Bhosale
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

FIR प्रत मिळाली
समीर
10/05/2022
19:45